RNI No. MAHBIL/2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार - ब

वर्ष ४, अंक ३८] मंगळवार, जून ५, २०१२/ज्येष्ठ १५, शके १९३४ [पृष्ठे १२
किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ८७

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ, आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

नियोजन विभाग (रोहयो)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक ५ जून २०१२

### अधिसूचना

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७.

क्रमांक परिषद-२०१२/प्र.क्र.९७/रोहयो १०.—महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (१९७८चा महा.२०) याच्या कलम १७ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, तसेच त्यासंदर्भात करण्यात आलेले, सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचा जेथवर यामध्ये अंतर्भूत बाबींशी संबंध असेल तेथवर, त्यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या नियमांचा पुढील मसुदा; त्याद्वारे परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, कलम १७ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे; आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा दिनांक २५ जून २०१२ रोजी किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती वा सूचना प्रधान सचिव, नियोजन विभाग(रोहयो), मंत्रालय, दालन क्र. ५३५ (मुख्य), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकापूर्वी येतील त्यांवर शासन विचार करील.

## नियमांचा मसुदा

क्रमांक.परिषद-२०१२/प्र.क्र.९७/रोहयो १०.—महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (१९७८चा महा. २०) याच्या कलम १७ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, तसेच यासंदर्भात करण्यात आलेले, सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचा जेथवर यामध्ये अंतर्भूत बाबींशी संबंध असेल तेथवर, त्यांचे अधिक्रमण करून ; महाराष्ट्र शासन, उक्त कलम १७ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्ध करण्यात येत असलेले पुढील नियम याद्वारे करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांना, महाराष्ट्र रोजगार हमी परिषद नियम, २०१२, असे म्हणावे.

२. **व्याख्या.**— या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (१९७८ चा महा. २०), असा आहे;

(ख) " अध्यक्ष " याचा अर्थ, राज्य परिषदेचा अध्यक्ष, असा आहे;

(ग) " परिषद " किंवा " राज्य परिषद " याचा अर्थ, कलम ४ च्या पोट कलम (१) अन्वये गठित केलेली, महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद, असा आहे;

(घ) " रोहयो " याचा अर्थ, शासनाची रोजगार हमी योजना,असा आहे;

(ड.) " कार्यकारी अध्यक्ष " याचा अर्थ, राज्य परिषदेचा सह-अध्यक्ष असा आहे;

(च) " कार्यकारी समिती " याचा अर्थ, नियम ८ च्या पोट-नियम(१) अन्वये गठित करण्यात आलेली, राज्य परिषदेची कार्यकारी समिती, असा आहे;

(छ) " शासन "याचा अर्थ, महाराष्ट्र शासन,असा आहे;

(ज) " मगांराग्रारोहयो " याचा अर्थ, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना,असा आहे;

(झ) " सदस्य " याचा अर्थ,परिषदेचा सदस्य असा असून त्यामध्ये अध्यक्ष व सदस्य-सचिव यांचा समावेश होतो;

(ञ) " पंचायत राजसंस्था "याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,१९६१ (१९६२ चा महा.५) अनुसार जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या व ग्राम पंचायत, असा आहे;

(ट) " कलम " याचा अर्थ, या अधिनियमाचे कलम, असा आहे;

(ठ) " योजना " याचा अर्थ, अधिनियमातील कलम ७ च्या पोट-कलम (२) अन्वये अधिसूचित केलेली योजना, असा आहे;

(ड) यामध्ये वापरलेले परंतु यात व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, अधिनियमामध्ये त्यांना यथाक्रम नेमून दिलेलेच अर्थ असतील.

**३. सदस्यांच्या नियुक्ती कालावधीच्या अटी व शर्ती :—**

(१) शासकीय सदस्यांचा पदावधी, तो ज्या पदाधिकाराने सदस्य आहे ते पद ज्या कालावधीमध्ये धारण करील त्या कालावधीतील असेल.

(२) अशासकीय सदस्य हा, दोन वर्षांच्या कालावधीसाठी किंवा त्याच्या जागी नियुक्त केलेला अन्य कोणताही सदस्य प्रभार घेईपर्यंत, यांपैकी जे अगोदर घडेल तेवढ्या कालावधीसाठी नियुक्त करण्यात येईल

(३) कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये नामनिर्देशित केलेला अशासकीय सदस्य मुंबई येथील मुख्यालयांमध्ये किंवा अन्य कोणत्याही ठिकाणी राज्य परिषदेच्या बैठकींना उपस्थित राहण्याच्या अथवा योजनेच्या कार्यासंबंधातील प्रयोजनाकरिता, किंवा परिषदेच्या कामकाजासंबंधातील कामाकरिता, शासन निर्णयानुसार अनुज्ञेय असलेल्या दराने प्रवास भत्ता आणि दैनिक भत्ता मिळण्यास हक्कदार असेल.

(४) अशासकीय सदस्य राज्य परिषदेने घेतलेल्या बैठकीला उपस्थित राहण्याकरिता किंवा राज्य परिषदेने मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही कामाकरिता, शासन निर्णयानुसार अनुज्ञेय असलेल्या दराने मानधन मिळण्यास हक्कदार असेल.

(५) पोट-नियम (२) व (३) यांच्या प्रयोजनांसाठी हक्क मिळण्याकरिता म्हणून, सदस्य-सचिवाने अगोदरच मान्यता दिलेली टिप्पणी सादर करणे आवश्यक आहे.

**४. अशासकीय सदस्याचा राजीनामा व निरसन :—**

(१) अशासकीय सदस्यास,—

(क) अध्यक्षाला उद्देशून आपल्या सहीनिशी लेखी स्वरूपात आपल्या पदाचा कोणत्याही वेळी राजीनामा देता येईल आणि तो राजीनामा स्वीकारण्यात आल्याच्या दिनांकापासून परिणामक होईल.

(ख) पोटनियम (२) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही बाबतीत अनर्ह ठरविलेले असेल तर, त्यास पदावरून दूर केले जाईल,

(२) नियम ३ च्या पोटनियम (२) अन्वये एखाद्या सदस्यास पदावरून दूर करण्याबाबतच्या राज्य शासनाच्या अधिकारांना बाधा न आणता, राज्य शासनास एखाद्या अशासकीय सदस्यास पुढील बाबतीत पदावरून दूर करता येईल जर-

(एक) तो नादार असल्याचे न्यायनिर्णीत केलेले असेल; किंवा

(दोन) त्याला नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरवलेले असेल; किंवा

(तीन) तो सदस्य म्हणून कार्य करण्यास शारीरिक अथवा मानसिक दृष्ट्या असमर्थ झालेला असेल ; किंवा

(चार) त्याने असा वित्तीय अथवा अन्य हितसंबंध संपादित केलेला असेल, ज्यामुळे असा सदस्य म्हणून त्याची कार्ये पार पाडण्यामध्ये बाधक परिणाम होण्याचा संभव असेल; किंवा

(पाच) त्याने आपल्या पदाचा अशा प्रकारे दुरुपयोग केलेला असेल की त्याचे पदावर असणे जनहिताच्या दृष्टिने बाधक होईल; किंवा

(सहा) त्याच्या नियंत्रणापलीकडील कारणांव्यतिरिक्त एरव्ही अथवा अध्यक्षाच्या परवानगी-शिवाय राज्य परिषदेच्या लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित राहिला असेल.

(३) राजीनामा, मृत्यू, पदावरून दूर करणे अशा किंवा अन्य कारणामुळे राज्य परिषदेच्या अशासकीय सदस्याचे कोणतेही पद रिक्त झाले तर ते पद, तो सदस्य ज्या प्रवर्गाचे प्रतिनिधित्व करीत होता त्या प्रवर्गातून भरण्यात येईल आणि ते रिक्त पद भरण्याकरिता नियुक्त केलेली व्यक्ती, ते पद रिक्त झाले नसते तर, ज्याच्या जागी तिला नियुक्त करण्यात आले आहे, त्याने सदस्य म्हणून ते पद जेवढ्या काळाकरिता धारण केले असते तेवढा काळ ते पद धारण करील.

**५. राज्य परिषदेच्या बैठका :-**

(१) राज्य परिषद, मुंबई येथील आपल्या मुख्यालयात किंवा अध्यक्ष किंवा कार्यकारी अध्यक्ष ठरवील अशा ठिकाणी व अशा वेळी वर्षातून किमान दोन वेळा अथवा परिषदेला आवश्यक वाटेल अशा आणखी वारंवारतेने बैठक बोलावील.

परंतु, राज्य परिषदेच्या दोन बैठकीच्या दरम्यान सहा महिन्यांचा कालावधी असणार नाही.

(२) राज्य परिषदेच्या प्रत्येक बैठकीस अध्यक्ष उपस्थित असल्यास तो बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल आणि त्याच्या अनुपस्थितीत कार्यकारी अध्यक्ष अशा बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारील.

(३) राज्य परिषदेच्या बैठकींकरिता सदस्यांच्या एक-तृतीयांशपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी मिळून गणपूर्ती होईल.

६. **बैठकींची कार्यपद्धती :—**

(१) राज्य परिषदेच्या बैठकींकरिता सदस्यांच्या एक-तृतीयांशपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी मिळून गणपूर्ती होईल.

(२) बैठकीकरिता गणपूर्ती होत नसल्यास, अध्यक्ष किंवा कार्यकारी अध्यक्ष यांपैकी कोणा एकास किंवा त्यांपैकी जो बैठकीस उपस्थित असेल व बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल त्यास, ती बैठक त्याच दिवशी नंतर ठेवता येईल अथवा अन्य कोणत्याही दिवशी व वेळी ठेवता येईल आणि अशा, पुढे ढकललेल्या बैठकीकरिता कोणतीही गणपूर्ती आवश्यक असणार नाही.

(३) राज्य परिषदेच्या निर्णयासाठी प्रस्तुत केलेल्या प्रत्येक प्रश्नावर, बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांच्या बहुमताने आणि मतदान घेऊन निर्णय घेण्यात येईल. समसमान मते पडल्यास, अध्यक्षस्थानी असणा-या व्यक्तीस निर्णायक मत असेल,

(४) अध्यक्षाची मान्यता मिळवल्यानंतर, सदस्य-सचिव त्या बैठकीचे कार्यवृत्त प्रसारित करील.

७. **राज्य परिषदेच्या अभिलेखाची अभिरक्षा व देखभाल :—**

राज्य परिषदेचा सदस्य-सचिव हा, परिषदेच्या अभिलेखाच्या अभिरक्षेस व देखभालीस जबाबदार असेल,

८. **कार्यकारी समिती :—**

(१) राज्य परिषदेस, तिला नेमून दिलेली कर्तव्ये बजावण्यासाठी आणि कार्ये पार पाडण्यासाठी सहाय्य करण्याकरिता, कार्यकारी समिती म्हणून संबोधण्यात येणारी एक समिती गठित करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये गठित केलेली कार्यकारी समिती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

| | | |
|---|---|---|
| (एक) रोजगार हमी योजना मंत्री | .... | अध्यक्ष |
| (दोन) रोजगार हमी योजना राज्यमंत्री | .... | सदस्य |
| (तीन) प्रधान सचिव (रोहयो) | .... | सदस्य |
| (चार) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना. | .... | सदस्य |
| (पाच) राज्य परिषदेने नामनिर्देशित केलेले एक जिल्हा कार्यक्रम समन्वयक. | .... | सदस्य |
| (सहा) राज्य परिषदेने नामनिर्देशित केलेले एक सहजिल्हा कार्यक्रम समन्वयक. | .... | सदस्य |

(सात) राज्य शासनाच्या उप सचिव दर्जापेक्षा कमी नसलेला व म.गां.रा.ग्रा.रोहयोचे कामकाज करणारा अधिकारी . .... सदस्य-सचिव

(आठ) राज्य परिषदेच्या अध्यक्षांनी नियुक्त केलेले परिषदेचे तीन अशासकीय सदस्य. .... सदस्य

९. कार्यकारी समितीची कार्ये :—

(१) राज्य परिषदेच्या सर्वसाधारण देखरेख व मार्गदर्शनानुसार कार्यकारी समितीची कार्य व कर्तव्ये, म्हणजे

(अ) राज्य परिषदेने घेतलेले निर्णय अंमलात आणण्यासाठी उपाययोजना करणे.

(ब) राज्य परिषदेच्या प्रशासन व वित्तीय बाबींचे व्यवस्थापन

(क) राज्य परिषदेच्या कामकाज खर्चासाठी निधी मंजूर करणे.

(ड) कायद्याच्या अंमलबजावणीचा दर्जा उंचावण्यासाठी तांत्रिक व अतांत्रिक बाबींवर सल्ला सूचविण्यासाठी विशेषतज्ञाचा गट वा समिती स्थापन करणे.

(इ) कलम ४ मधील उपकलम (३) व (४) अन्वये राज्य परिषदेला नेमून दिलेली कार्य व कर्तव्ये पार पाडण्यास मदत करणे.

(ई) राज्य परिषदेने सोपविल्याप्रमाणे अधिकारांचा वापर करणे आणि दिलेली कार्ये पार पाडणे.

(२) कार्यकारी समितीची बैठक तीन महिन्यातून किमान एकदा किंवा कार्यकारी समितीच्या अध्यक्षास आवश्यक वाटल्यास आणखी वारंवारतेने घेण्यात येईल.

१०. राज्य परिषदेचा निधी :—

राज्य परिषदेकडे अधिनियमान्वये किंवा या नियमांन्वये सोपवलेला कारभार आणि कार्ये यांच्या संबंधातील तिचा खर्च, शासनाच्या नियोजन विभागाने (रोहयो) रोहयोच्या मंजूर वार्षिक अर्थसंकल्पातून परिषदेला दिलेल्या वार्षिक किंवा त्रैमासिक पतमर्यादेमधून भागवण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व्ही. गिरीराज,**

शासनाचे प्रधान सचिव (रोहयो).

## PLANNING DEPARTMENT (EGS)

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya
Mumbai 400 032, dated the 5th June 2012

*NOTIFICATION*

THE MAHARASHTRA EMPLOYMENT GUARANTEE ACT, 1977.

No. Council. 2012/CR 97/EGS-10.—The following draft of rules which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 17 of the Maharashtra Employment Guarantee Act,1977 (Mah.XX of 1978) and all other powers enabling it in that behalf and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, in so far as they relate to the matters contained herein; is hereby published as required by sub-section (3) of section 17, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 25th day of June, 2012.

2. Any objections or suggestions which may be received by the Principal Secretary, Planning Department (EGS), Room No-535(Main), Mantralaya ,Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft before the aforesaid date will be considered by the Government.

*DRAFT RULES*

No. Council. 2012/C. R. 97/EGS-10.—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 17 of the Maharashtra Employment Guarantee Act,1977 (Mah.XX of 1978), and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, in so far as they relate to the matters contained herein; the Government of Maharashtra hereby makes the following rules, the same having been previously published as required by sub-section (*3*) of the said section 17, as follows namely :—

**1. Short title**.—These rules may be called the Maharashtra Employment Guarantee Council Rules, 2012.

**2 . Definitions**—In these rules, unless the context otherwise requires—

(*a*) " Act " means the Maharashtra Employment Guarantee Act 1977 (Mah.XX of 1978) ;

(*b*) "Chairperson" means the Chairperson of the State Council ;

(*c*) "Council" or "State Council" means the Maharashtra state Employment Guarantee council constituted under sub-section (*1*) of section 4 ;

(*d*) "EGS" means the Employment Guarantee Scheme of the Government ;

(*e*) "Executive Chairperson" means Co-Chairperson of the State Council ;

(*f*) "Executive Committee" means the Executive Committee of the State Council constituted under sub-rule (1) of rule 8 ;

(*g*) "Government" means the Government of Maharashtra;

(*h*) "MGNREGS" means the Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Scheme ;

(*i*) "Member" means the Member of the Council and includes Chairperson and Member—Secretary ;

(*j*) "Panchayat Raj institutions" means the Zilla Parishads and Panchayat Samitis and Village Panchayat as per the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samities Act,1961 (Mah.V of 1962);

(*k*) "Section" means the section of the Act ;

(*l*) "Scheme" means the scheme notified under sub-section (2) of section 7 of the Act ;

(*m*) words and expression used but not defined herein shall have the meaning respectively assigned to them in the Act.

3. **Terms and conditions of appointment of members.**— (1) The term of official members shall be during the period he holds the office by virtue of which he is a Member.

(2) A non-official member shall be appointed for a period of two years or till any other member appointed in his place takes charge, whichever is earlier.

(3) The non-official members nominated under sub-section (*1*) of section 4 shall be entitled to receive for the purpose of attending meetings of the State Council or in connection with the functions of the scheme or for the work in connection with the affairs of the council, at the headquarters at Mumbai or at any other place, the travelling allowance and daily allowance at the rate, as admissible as per Government Resolution.

(4) The non-official members shall be entitled to receive honorarium at the rate as admissible as per Government Resolution for attending the meeting held by the State Council or for any other work approved by the State Council.

(5) For entitlement for the purposes of sub-rules (2) and (3), it is necessary to submit a note pre approved by the Member-Secretary.

**4. Resignation and removal of non-official member.**— (1) A non-official member may,—

(*a*) by writing under his hand addressed to the Chairperson, resign his office at any time and the resignation shall take effect from the date of its acceptance.

(*b*) be removed from his office, in case he incurs any disqualification mentioned in sub-rule (2).

(2) Without prejudice to the powers of the State Government for removal of a member under sub-rule (2) of rule 3, the State Government may, remove from office a non-official member if he,--

(*i*) has been adjudged as an insolvent; or

(*ii*) has been convicted for an offence involving moral turpitude; or

(*iii*) has become physically or mentally incapable of acting as a member, or

(*iv*) has acquired such financial or other interest as is likely to affect prejudicially his functions as such member,or

(*v*) has so abused his position as to render his continuation in office prejudicial to public interests, or

(*vi*) remains absent for three consecutive meetings of the State Council except for reasons beyond his control or without the permission of the Chairperson.

(3) Any vacancy in the office of the State Council due to resignation, death, removal or otherwise of non-official member shall be filled from the same category which such member was representing and the person appointed to fill in the vacancy shall hold office so long as the member in whose place he was appointed would have held the office, if such vacancy had not occurred.

**5. Meetings of State Council.**—(1) The State Council shall meet at least twice in a year or more frequently as it may deem necessary, at its

headquarters at Mumbai or at such place and at such times, as may be decided by the Chairperson or the Executive Chairperson :

Provided that, six months shall not intervene between two meetings of the State Council.

(2) The Chairperson shall preside over at every meeting of the State Council, at which he is present, and in his absence, the Executive Chairperson shall preside over such meeting.

(3) Not less than one-third of the Members shall constitute the quorum for the meetings of the State Council.

6. **Procedure of Meetings**.— (1) Not less than one-third of the Members shall constitute the quorum for the meetings of the State Council.

(2) If there is no quorum for the meeting, the Chairperson or Executive Chairperson, either or who is present and presides over the meeting may postpone the meeting on the same or on any other day and time and no quorum shall be required for such adjourned meeting.

(3) Every question put up for decision of the State Council shall be decided by the majority of the members present and voting at the meeting. In case of equality of votes, the person presiding shall have a casting vote.

(4) The Member-Secretary shall, after obtaining the approval of the Chairperson, circulate the minutes of such meeting

7. **Custody and maintenance of records of State Council** :—The Member-Secretary of the State Council shall be responsible for the custody and maintenance of the records of the Council.

8. **Executive Committee.**—(1) The State Council may constitute a Committee to be called the Executive Committee to assist it to discharge the duties and perform the functions assigned to it.

(2) The Executive Committee constituted under sub-rule (1) shall consist of :—

| | | | |
|---|---|---|---|
| (*i*) | Minister for EGS | ... | Chairperson; |
| (*ii*) | State Minister for EGS | ... | Member ; |
| (*iii*) | Principal Secretary (EGS). | ... | Member ; |
| (*iv*) | Commissioner, MGNREGS | ... | Member ; |

| | | | |
|---|---|---|---|
| (*v*) | One District Progamme Co-ordinator to be nominated by the State Council. | ... | Member ; |
| (*vi*) | One Joint District Programme Co-ordinator to be nominated by the State Council. | ... | Member ; |
| (*vii*) | An Officer of the State Government not below the rank of Deputy Secretary to Government working in respect of MGNREGS. | ... | Member-Secretary ; |
| (*viii*) | Three non-official members of the State Council, appointed by the Chairperson of the State Council. | ... | Member. |

**9. Functions of the Executive Committee.**— (1) Subject to the general superintendence and directions of the State Council, the Executive Committee shall perform the following duties and functions, namely :—

(*a*) take steps to give effect to the decisions made by the State Council;

(*b*) manage the administrative and financial affairs of the State Council;

(*c*) sanction expenditure in connection with the affairs of the State Council;

(*d*) appoint expert groups or Committees for technical and non technical support and render advice to improve the quality of implementation of the Act;

(e) assist the State Council for carrying out its functions and duties assigned as per sub-sections (*3*) and (*4*) of section 4;

(*f*) exercise such powers and perform such function as may be entrusted to it by the State Council;

(2) The Executive Committee shall meet at least once in three months or more frequently, if required by the Chairperson of the Executive Committee.

**10. Funds of State Council.**—The State Council shall meet its expenses in connection with the affairs and functions entrusted to it under the Act or these rules from the annual or quarterly credit limit released to it by the Planning Department (EGS) of the Government from the approved Annual budget for EGS.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. GIRIRAJ,
Principal Secretary (EGS)
to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.